# सायबर जनजागृती रथाचे उद्घाटन



(छायाचित्र- पुरूषोत्तम जोशी)

**नांदेड / प्रतिनिधी**

अलिकडील काळात ऑनलाईन व्यवहाराचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे सायबर गुन्हे घडून जनतेची आर्थिक फसवणुक होण्याचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत आहे. सदरच्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी ऑनलाईन आर्थीक व्यवहार तसेच सोसल मिडीयाचा वापर करताना कोणत्या गोष्टी कराव्यात व कोणत्या गोष्ठी करू नये, याबाबत जनतेमध्ये सायबर गुन्हयाबाबत जनजागृती करण्यासाठी मा. श्री डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड, परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनखाली श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, नांदेड यांचे संकल्पनेतुन क्वीकहिल फाउंडेशन व नांदेड पोलीस यांचे संयुक्त विधमाने सायबर सुरक्षा रथ तयार करण्यात आला आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सायबर जनजागृती रथाव्दारे मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे परिणाम, सोशल मिडीया व ऑनलाईन पेमेंट ॲप वापरताना कोण कोणती खबरदारी घ्यावी व आपली ऑनलाईन फसवणुक होणार नाही याबाबत कशाप्रकारे काळजी घ्यावी तसेच ऑनलाईन सायबर क्राईम कशा प्रकारे होतात जसे की सोशल मिडीयाचे प्रोफाईल लॉक न केल्यामुळे, आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी दिल्याने, कोणत्याही अनोळखी लिंकला क्लीक करून त्यावर आपले बँक खात्याची माहिति दिल्याने कश्याप्रकारे फसवणुक होते. याबाबत पथनाटय सादर करून सायबर जनजागृती करण्यात येणार आहे. सायबर जनजागृती रथ नांदेड जिल्हयातील 36 पोलीस स्टेशनचे अंतर्गत शाळा, कॉलेज, महाविद्यालय व गर्दीचे ठिकाणी असे एकुण १२८ ठिकाणी जावून जनतेमध्ये सायबर जनजागृती करणार आहे. यावेळी श्रीकृष्ण कोकाटे, अविनाश कुमार,खंडेराय धरणे,डॉ.अश्विनी जगताप,स्थागुशाचे पोलिस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, उपनिरीक्षक श्रीमती अलका कहाळेकर, सपोनि शिवाजी लष्करे उपस्थित होते.

सायबर जनजागृती पथनाटयामध्ये क्वीकहिल फाउंडेशनतर्फे आधार सामाजिक विकास संस्था सातारा यांचे सुनील नलावडे, मल्हारी जाधव, राजेंद्र मोरे, ऋत्विक रांस्ते, सुयश बाबर, किरण घोदे, गणेश महाजन इत्यादी कलाकारांनी भाग घेतला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक जी.बी.दळवी, सोपान थोरवे,दीपक ओढणे,काशीनाथ कारखेडे व सायबर पोलीस ठाणे, नांदेड विभागाचे अधिकारी अंमलदार यांनी सायबर जनजागृती रथाचे नियोजन केले आहे.